<u>नि.दि.मु.नं.१४८/२०२३ (नि.३४ लगत)</u>

<u>उलटतपास शपथेवर सुरु</u>

<u>उलटतपास प्रतिवादींतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. ए. आर. कुलकर्णी</u>

माझे चौथीचे शिक्षण झाले असुन मला लिहता वाचता येते. दावा मिळकतीचा गट नं.८ असुन त्याचे क्षेत्र २ एकरचे पुढे आहे. मी दोन ते तीन वर्षापुर्वी दावा मिळकतीचा सात बारा उतारा पाहिला होता. हे म्हणणे खरे आहे की दोन वर्षापुर्वी दावा मिळकतीचा सात बारा उतारा पाहण्याचा योग न आल्यामुळे दावा मिळकतीच्या सात बारा उताऱ्यात काय नोंदी होत्या याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकत ही देवस्थान मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की जुन्या उताऱ्यांवर देवस्थानची नोंद आहे हे मी पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकत देवस्थानची आहे किंवा नाही याची देखील मला माहिती नाही. माझ्याकडे २ बैल असुन औतकाठी आहे. गट नं.८ ची मिळकत मी वहिवाटतो. हे म्हणणे खरे आहे की मी वहिवाटतो हे दाखविण्याकरीता माझ्या तोंडी शब्दाशिवाय इतर कोणताही पुरावा नाही. मी गोन्सालवीस यांच्याकडे माळी काम करतो. मला १५,०००/- रुपये पगार मिळतो. हे म्हणणे खरे नाही की गोन्सालवीस यांनी घर बांधले आहे व त्याचा वापर शेतघर म्हणुन करतात हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की मला माहिती नसताना सदर मिळकतीशी देवस्थानचा संबंध नाही असे लिहले आहे. हे म्हणणे खरे नाही की केवळ वादीला मदत करण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकतीमध्ये शेती होत नाही.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई.
दिनांक : ११.०७.२०२५

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, वाई.